
ओ३म्

## मराठी

# आर्योद्देश्यरत्नमाला




## श्रीमद्दयानन्द सरस्वती स्वामी निर्मिता

॥ ओ३म् ॥

# मराठी

# आर्योद्देश्यरत्नमाला



श्रीमद्दयानन्द सरस्वती स्वामी निर्मिता

ईश्वरादितत्वलक्षण प्रकाशोज्वला

आर्य भाषा प्रकाशोज्वला


अनुवादक :

उत्तम मुनि वानप्रस्थ

सम्पादक :

आचार्य ब्र० नन्दकिशोर



वैदिक साहित्य प्रतिष्ठान

*प्रकाशक*

**वैदिक साहित्य प्रतिष्ठान**
२७०४, गली पत्ते वाली, श्रद्धानन्द बाजार,
नया बाजार, दिल्ली-११०००६

●

*सहयोग :*

**श्री रामकिशोर कासदेव जी**
आठनेर, जि० बैतूल (मध्यप्रदेश)

●

*पुस्तक प्राप्ति स्थान :*

१. **श्री मन्त्री परोपकारिणी सभा**
   अजमेर, (राजस्थान)
२. **आर्यसमाज परली बैजनाथ**
   जि० बीड, महाराष्ट्र
३. **आर्ष गुरुकुल नर्मदापुरम**
   जि० होशंगाबाद, (मध्यप्रदेश)

●

प्रथम संस्करण : २००० प्रतियाँ
दीपावली, सन् २०१२

●

मूल्य : **दस रुपया**

●

शब्द संयोजक :
**वैदिक प्रेस,** कैलाशनगर, दिल्ली-३१

●

मुद्रक :
**राधा प्रेस,** गांधीनगर, दिल्ली-३१

# आर्योद्देश्यरत्नमाला

१. **ईश्वर**—ज्याचे गुण कर्म स्वभाव आणि स्वरूप सत्यच असून जो, केवळ चेतन वस्तु आहे व जो अद्वितीय सर्व शक्तिमान निराकार, सर्वत्र व्यापक, अनादि अनंत इत्यादि सत्य गुण युक्त आहे आणि ज्याचा स्वभाव अविनाशी, ज्ञानी, आनंदी शुद्ध न्यायकारी दयाळु आणि अजन्मादि आहे, ज्याचे कार्य जगताची उत्पत्ती पालन आणि विनाश करणे व सर्व जीवांना त्याच्या पाप पुण्या चे योग्य फल देणे आहे त्याला ईश्वर म्हणतात।

२. **धर्म**—ज्याचे स्वरूप ईश्वरीय आज्ञेचे पालन करने आणि पक्षपात रहित न्याय व सर्वांचे हित करने आहे जो प्रत्यक्षादि प्रमाणानि सुपरिक्षित आहे व वेदोक्त असल्या कारणाने र्व मनुष्याना हाच एक धर्म मानणे योग्य आहे धर्म असे म्हणतात ।

३. **अधर्म**—ज्याचे स्वरूप ईश्वरीय आज्ञेचे उल्लंघन करुन पक्षपाती व अन्यायी होवून यथा योग्य निर्णय न करता स्वतः चे हित साधणे आहे व अविद्या दूराग्रह अहंकार करता इत्यादि दोष असल्या मूले वेद विद्येच्या विरुद्ध आहे म्हणून हा अधर्म सर्व मानवांनी सोडणे आहे, म्हणून याला अधर्म असे म्हणतात ।

४. **पुण्य**—पुण्य म्हणजे विद्यादि शुभ गुणांचे दान व सत्य वचनानी सत्याचरण करणे म्हणजेच पुण्य होय।

५. **पाप**—जे पुण्याच्या विरुद्ध आहे म्हणजे खोटे

बोलणे इत्यादि त्यास पाप म्हणावे ।

६. **सत्यभाषण**–जे काही आपल्या अंतरात्म्यात आहे व असंभवादि दोषा पासून मुक्त होवून सदा सर्वदा सत्य बोलावे त्यास सत्य भाषण म्हणतात ।

७. **मिथ्याभाषण**–जे सत्याच्या विरुद्ध असेल अर्थात सत्यवचनाच्या विरुद्ध आहे त्याला मिथ्याभाषण म्हणतात ।

८. **विश्वास**–ज्याचा मूळ अर्थ आणि फल निश्चित पणे सत्यच आहे त्याचे नाव विश्वास आहे ।

९. **अविश्वास**–जो विश्वासाच्या उलट असून त्याचा तत्वार्थ काही त्याला अविश्वास म्हणतात ।

१०. **परलोक**–परलोक म्हणजे सत्यविद्ये द्वारा परमेश्वराची प्रीती पूर्वक ह्या जन्मी पुनर्जन्मात किंवा मोक्षात परम सुखाची प्राप्ती होते त्यास परलोक म्हणतात।

११. **अपरलोक**–जे परलोकाच्या उलट अर्थात ज्या मध्ये दु:ख विशेषभोगावे लागते त्याला अपरलोक म्हणतात।

१२. **जन्म**–जीवात्मा कोणत्याहि शरीराशी संयोग होवून कर्म करण्यास समर्थ होतो त्यास जन्म असे म्हणतात।

१३. **मरण**–ज्या शरीराचे धारण करून जीव कर्म करतो त्या शरीराचा आणि जीवाच्या जया वेळी वियोग होतो त्याला मरण म्हणतात ।

१४. **स्वर्ग**–जीवाला ज्या वेळी सुख व सुखाची साधने प्राप्त होतात त्या स्थितीला स्वर्ग म्हणतात ।

१५. **नरक**–जिवाला ज्या वेळी विशेष दु:ख व दु:खाची सामाग्री प्राप्त होते त्याला नरक म्हणतात ।

१६. **विद्या**–ज्या योगे ईश्वरापासुन ते पृथ्वीपर्यंत सर्व पदार्थांचे सत्यज्ञान विज्ञान होते व त्याचा यथायोग्य उपयोग व उपकार घेतला जातो त्याचे नाव विद्या आहे।

१७. **अविद्या**–जे विद्येच्या विपरीत म्हणजे भ्रम, अंधकार व अज्ञानरूप आहे त्यास अविद्या म्हणतात ।

१८. **सत्पुरुष**–जे सत्य प्रिय, धर्मात्मा विद्वान् सर्वांचे हितचिंतक महाशय असतात ते सत्पुरुष म्हणले जातात ।

१९. **सत्सङ्गकुसङ्ग**– ज्या मुळे असत्याचा त्याग केल्याने सत्याची प्राप्ती होते त्यास सत्संग म्हणतात व ज्या कुकर्मात जीव बुडून जातो त्यास कुसंग म्हणतात।

२०. **तीर्थ**–सर्व विद्याभ्यास, सुविचार, ईश्वरोपासना, धर्मानुष्ठान, सत्संग, ब्रह्मचर्य, जितेन्द्रियादि उत्तम कर्म आहेत या सर्वांना तीर्थ म्हणावे कारण या मूळे जीव दु:ख सागरातून तरून जातो ।

२१. **स्तुती**–ईश्वर अथवा एखाद्या पदार्थाचे गुण, ज्ञान, कथन, श्रवण, व सत्यभाषण करणे म्हणजे त्याच्या सत्यगुणाचे वर्णन करणे म्हणजे स्तुती होय ।

२२. **स्तुतीचे फळ**–गुणाचे व ज्ञानाचे गान केल्याने गुणवान पदार्था बद्दल प्रिती उत्पन्न होते हे स्तुती चे फळ होय ।

२३. **निंदा**–जे मिथ्या ज्ञान मिथ्या-भाषण असत्याचा आग्रह याला निंदा म्हणतात ज्या मध्ये गुणा एवजी

अवगुण जोडले जातात ।

२४. **प्रार्थना**—स्वतःच्या पूर्ण पुरूषार्थानंतर उत्तम कर्माच्या सिद्धिसाठी परमेश्वराचे अथवा एखाद्या समर्थ सहाय्य घेणे म्हणजे प्रार्थना होय ।

२५. **प्रार्थनेचे फळ**—अहंकाराचा नाश आत्मा मध्ये आर्द्रता गुण ग्रहण करण्यात पुरुषार्थ आणि अत्यंत प्रितीवाटणे हे प्रार्थनेचे फळ आहे ।

२६. **उपासना**—ईश्वराच्याच आनंद स्वरूपात स्वतः स मग्न करणे म्हणजे उपासना होय ।

२७. **निर्गुणोपासना**—शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, संयोग, वियोग, वज़नाने हलके किंवा जड़, अविद्या, जन्म, मरण, आणि दुःख आदि गुणांनी रहित अशा परमात्म्याला जाणून घेऊन जी उपासना केली जाते त्याला निर्गुणोपासना असे म्हणतात ।

२८. **सगुणोपासना**—परमेश्वरला सर्वज्ञ सर्वशक्तिमान, शुद्ध, नित्य, आनंदस्वरूप, सर्वत्रव्यापक, एकसनातन सर्वकर्त्ता, सर्वाधार, सर्वस्वामी, सर्वनियन्ता, सर्वातंरयामी, मंगलमय, सर्वानंदप्रद, सर्वपिता, सर्व जगाची रचना करणारा, न्यायकारी, दयाळु आदि सत्य गुणांनी युक्त जाणून त्याची उपासना केली जाते त्याला सगुणोपासना म्हणावे ।

२९. **मुक्ती**—ज्या मूळे सर्व वाईट कामापासून व जन्म मरणादि दुःखसागरापासुन मुक्त होवून सुख स्वरूप परमेश्वराची प्राप्ती करून घेवून सुखातच राहणे म्हणजे

मुक्ती होय ।

३०. **मुक्तिची साधने**–पूर्वोक्त ईश्वराची कृपा, स्तुती, प्रार्थना, उपासना करणे, धर्माचे आचरण करने, पुण्यकर्म करने, सत्संग, विश्वास तीर्थ सेवन सत्पुरूषांचा सहवास परोपकारादि सर्व उत्तम काम करणे आणि दुष्कृत्यापासुन दूर राहणे ही सर्व मुक्तिची साधने आहेत।

३१. **कर्त्ता**–जो स्वतः मतेने कर्म करणारा असतो व जाच्या स्वाधीन सर्व साधन असतात त्याला कर्त्ता म्हणतात।

३२. **कारण**–कर्त्ता एखादे कार्य किंवा वस्तु ज्या पदार्थाला घेवूनच करू शकतो अर्थात् ज्या शिवांय कोणतीहि वस्तु बनूच शंकत नाही त्याला कारण म्हणावे त्याचे तीन प्रकार आहेत ।

३३. **उपादान कारण**–ज्याचेग्रहणकरूनच उत्पन्न होत असते अथवा काही केले जाते जसी माती पासून मडके तयार होते त्याला उपादानकारण म्हणतात ।

३४. **निमित्त कारण**–जो बनविणारा आहे ज्या प्रमाणे कुंभार मडके बनवतो अशाप्रकारच्या पदार्थाना निमित्त कारण असे म्हणतात ।

३५. **साधारण कारण**–जसे चाकदंड वगैरे व दिशा आकाश व प्रकाश आहेत याना साधारण कारण म्हणतात ।

३६. **कार्य**–जे एखाद्या पदार्थाच्या विशेष संयोगाने स्थूल होवून कामात उपयोगी होते अर्थात जे करण्यास योग्य बनते ते त्या कारणाचे कार्य आहे ।

३७. **सृष्टी**–कर्त्याची रचना असून कारण रूपी द्रव्याशी विशेष संयोग होवूनं अनेक प्रकारचे कार्यरूप बनून वर्त्तमानकाळात व्यवहार करण्याचा योग्य आहे त्याला सृष्टी म्हणतात ।

३८. **जाती**–जी जन्मपासून मृत्युपर्यन्त तशीच कायम राहते व जी अनेक प्राणी मात्रात एक सारख्या रूपात आढळून येते जी ईश्वरकृत असते अर्थात् मनुष्य, गाय, घोड़ा आणि वृक्षादि समुह आहे त्याला जाती असे संबोधले जाते ।

३९. **मनुष्य**–जो विचार केल्या शिवाय कोणते हि काम करीत नाही त्याला मनुष्य म्हणतात अर्थात विचार करून काम करणाला प्राण्यासच मनुष्य म्हणतात ।

४०. **आर्य**–जे श्रेष्ठ स्वभावाचे असतात धर्मात्मा परोपकारी आणि सत्य विद्यादि गुणयुक्त असतात व जे निरंतर आर्यावर्त्त देशात राहणारे आहेत त्याना आर्य म्हणावे ।

४१. **आर्यावर्त्तदेश**–हिमालय, विन्ध्याचल, सिन्धु नदी, आणि ब्रह्मपुत्रा नदी यांच्या अंतर्गत व त्यांचा जेथ पर्यंत विस्तार आहे या सर्वांच्या मध्ये जो देश आहे त्याचे नाव आर्यावर्त्त देश आहे ।

४२. **दस्यु**–अनार्य अर्थात जो अडाणी आर्यांच्या स्वभाव व निवासा पासून पृथक आहे डाकू, चोर हिंसक जो दुष्ट माणूस आहे त्याला दस्यु म्हणावे ।

४३. **वर्ण**–जो गुण कर्माच्या दोग्यते नूसार ग्रहण

केल्या जातो हा वर्ण या शब्दाचा अर्थ आहे ।

४४. **वर्णाचे भेद**—ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हे वर्णाचे भेद आहेत ।

४५. **आश्रम**—ज्या मध्ये अत्यन्त परिश्रम करून उत्तम गुण ग्रहण व श्रेष्ठ कामे केली जातात त्याला आश्रम म्हणतात ।

४६. **आश्रमाचे भेद**—सद्विद्या आदि शुभ गुणाचे ग्रहण करून जितेन्द्रिय राहून आत्मा आणि शरीराचे सामर्थ्य वाढ विण्यासाढी ब्रह्मचर्याश्रम आहे संतानोपत्ती आणि विद्यादि सर्वं व्यवहाराची सिद्धी करण्यासाठी गृहास्थाश्रम आहे व सर्वांवर उपकार करण्यासाठी सन्यास आश्रम असतो हे चार आश्रम म्हणवले जातात ।

४७. **यज्ञ**—अग्निहोत्र ते अश्वमेध यज्ञा पर्यंत जो शिल्पव्यवहार आणि पदार्थ विज्ञान आहे तसेच जे कार्य जगावर उपकार करण्यासाठी केले जाते त्याला यज्ञ म्हणावे ।

४८. **कर्म**—जीव, मन, शरीर व इन्द्रियाने जे विशेष कार्य करतो त्यास कर्म म्हणतात ते शुभ अशुभ व मिश्रित असे तीन प्रकार चे असतात ।

४९. **क्रियामाण**—जे कार्य वर्तमानकाळात केले जाते त्यास क्रियामाण कर्म म्हणतात ।

५०. **संचित**—क्रियामाण कर्माच्या संस्काराचा संचय जो ज्ञानात होतो त्याला संचित म्हणावे ।

५१. **प्रारब्ध**—पूर्विकेलेल्या चांगल्या वाईट कर्माचे

सुख दू:ख रूपी फळाचा भोग भोगला जातो त्यास प्रारब्ध म्हणतात ।

५२. **अनादि पदार्थ**–ईश्वर, जीव, आणि जगताचे मूल कारण हे तीन्ही स्वरूपतः च अनादि आहेत ।

५३. **प्रवाह रूपाने अनादिपदार्थ**–कार्य जगत जीवाचेकर्म आणि जे संयोग वियोग आहे हे तीन परंपरेने अनादि आहेत ।

५४. **अनादि चे स्वरूप**–जे कधी उत्पन्न होत नाही ज्याचे कारण ही काही असत नाही जे निरंतर सदा सर्वदा स्वयंसिद्ध वर्त्तमान रूपाने कायम असते त्याला अनादि म्हणतात ।

५५. **पुरुषार्थ**–अर्थात सदा सर्वदा आळस सोडून उत्तम व्यवहाराच्या सिद्धीसाठी मनाने वाणीने शरीराने आणि धनाने भरपूर उद्योग करणे म्हणजे त्याला पुरूषार्थ म्हणावे !

५६. **पुरुषार्थाचेभेद**–अप्राप्त वस्तु प्राप्त करून घेण्याची इच्छा प्राप्त झालेल्या वस्तुचे संरक्षण करने, संरक्षित वस्तुची वाढ करणे, आणि वृद्धि झालेल्या सामग्रीचि विद्येच्या प्रचारार्थ व सर्वांच्या हितार्थ खर्च करणे या चार प्रकारच्या कार्याला पुरुषार्थ म्हणतात ।

५७. **परोपकार**–आपल्या सर्व सामर्थ्यानिजे अन्य प्राण्याच्या सुखासाठी तन, मन, व धनाने प्रयत्न करण्याच्या कार्यास परोपकार म्हणतात ।

५८. **शिष्टाचार**–ज्या मध्ये शुभ गुणांचे ग्रहण

आणि अशुभ गुणांचा त्याग केला जातो त्याला शिष्ठाचार म्हणावे ।

५९. **सदाचार**—जो सृष्टी आरंभापासुन आज पर्यंत सत्पुरुषांचा वेदोक्त आचार चालत आला आहे ज्या मध्ये सत्याचेच आचरण व असत्याचा परीत्याग केलेला आहे त्याला सदाचार म्हणावे ।

६०. **विद्यापुस्तक**—जे ईश्वरोक्त सनातन सत्य विद्यामय चार वेद आहेत त्यालाच विद्यापुस्तक म्हणावे।

६१. **आचार्य**—जो श्रेष्ठ आचाराचे ग्रहण करवितो आणि सर्व विद्या शिकवतो त्याला आचार्य म्हणावे ।

६२. **गुरु**—जो वीर्यदान देवन भोजनादि देवून पालन पोषण करतो या साठी पित्याला गुरु म्हणतात आणि जो आपल्यां सत्योपदेशाने हृदयातिल अज्ञानरूपी अंधःकाराला नाहि से करतो त्याला हि आचार्य व गुरु म्हणतात ।

६३. **अतिथी**—ज्याची येण्याजाण्याची तिथी निश्चित नसते व तो विद्वान असून सर्वत्र भ्रमण करून प्रश्नोत्तर रूपाने आपल्या उपदेशाने सर्वमाणसांवर व जीवावर उपकार करतो त्याला अतिथी म्हणतात ।

६४. **पंचायतन पूजा**—जीवंत माता, पिता, आचार्य, अतिथी, आणि परमेश्वराचा यथायोग्य आदर व सत्कार करुन त्यांना प्रसन्न करणे म्हणजे पंचायतन पूजा आहे।

६५. **पूजा**—ज्ञानादि गुण असलेल्याचा यथा योग्य सत्कार करणे त्याची पूजा होय।

६६. **अपूजा**—ज्ञानरहित जड़पदार्थांचा व जे

सत्कारकरण्यास अयोग्य आहेत त्यांचा सत्कार करणे म्हणजे अपूजा होय ।

६७. **जड़**–जी वस्तु ज्ञानादि गुण रहित आहे त्याला जड़ म्हणावे ।

६८. **चेतन**–जो पदार्थ ज्ञानादि गुणयुक्त आहे त्याला चेतन म्हणावे ।

६९. **भावना**–जी वस्तु जशी आहे त्या विषयी विचार करून निश्चय करावा पण तो विचार निर्भ्रम असला पाहिजे अर्थात जी वस्तु जशी आहे तिलातसेच समझावे याला भावना म्हणतात ।

७०. **अभावना**–जी भावनेच्या विरूद्ध असेल अर्थात मिथ्याज्ञानामूळे एखाद्या वस्तु संबंधी अन्य समजून घेणे जसे जड़ पदार्थात चेतनाची व चेतन पदार्थात जडाची भावना करूण घेणे म्हणजे ती अभावना होय ।

७१. **पंडीत**–जो सत्य व असत्य याला विवेकाने जा नू शकतो धर्मात्मा सत्यवादी, सत्यप्रिय विद्वान आणि सर्वांचा हितैषी असते ।

७२. **मूर्ख**–जो अज्ञानी, हट्टी वा दूराग्रहादि दोषयुक्त असतो त्याला मूर्ख म्हणावे ।

७३. **ज्येष्ठकनिष्ठ व्यवहार**–जो लहान मोठ्यांशी यथायोग्य व्यवहार करतो व परस्परांचा मान सम्मान करतो त्याला ज्येष्ठ कनिष्ठ व्यवहार म्हणतात ।

७४. **सर्वहित**–तन, मन आणि धनाने सर्वांच्या सुखाची वृद्धि करण्याचा प्रयत्न व उद्योग करण्याचा

क्रियेस सर्वहित म्हणतात ।

७५. **चोरी त्याग**–एखाद्या पदार्थांच्या मालकाच्या आज्ञे शिवाय त्या पदार्थाचे ग्रहण करणे म्हणजे चोरी होय आणि त्याचा त्याग करणे म्हणजे चोरीचा त्याग करणे होय ।

७६. **व्यभिचार त्याग**–स्व स्त्री शिवाय अन्य स्त्री बरोबर गमन करने आणि आपल्या स्त्रीला ऋतुकाला शिवाय वीर्यदाण देणे व स्व स्त्री बरोबर ही अत्यंत वीर्यनाश करणे आणि युवावस्थेपूर्विच विवाह करणे या सर्वांना व्यभिचार समजाव आणि या सर्वांचा त्याग करण्याला व्यभिचार त्याग म्हणतात ।

७७. **जीवोचे स्वरूप**–जो चेतन अल्पज्ञ इच्छा द्वेष, प्रयत्न, सुख, दुःख आणि ज्ञानयुक्त गुंणाचा असुन जो नित्य आहे त्याला जीव म्हणावे ।

७८. **स्वभावः**–ज्या वस्तुचा जो स्वाभाविक गुण आहे जसे अग्नित रूप आणि दाह आहे अर्थात जो पर्यन्त ती वस्तु कायम आहे तो पर्यंत त्या वस्तु चा गुण ही जात नाही यामूळे त्याला स्वभाव असे म्हणतात ।

७९. **प्रलय**–कार्य जगताचे कारणरूप होणे अर्थात जगाचा निर्माता ईश्वर ज्या ज्या कारणानी सृष्टीची अनेक प्रकारे रचनाकरुन तिचे पालन करतो व पुन्हा कारणरूप करतो या क्रियेला अथवा अवस्थेला प्रलय म्हणतात ।

८०. **मायावी**–छल, कपट आणि स्वार्थातच प्रसन्नता

वाटणे आणि दंभ अहंकार शठतादि दोषांनी युक्त असते याला माया म्हणतात आणी जो या दोषांनी युक्त आहे त्याला मायावी म्हणतात ।

८१. **आप्त**–जो छल इत्यादि दोष रहित धर्मात्मा विद्वान, सत्योपदेष्टा सर्वांवर कृपा दृष्टी ठेवणारा अविद्यादि अंधकाराचा नाश करून अज्ञानी लोकांच्या आत्म्यात विद्यारूपी सूर्यांचा प्रकाश निरंतर करणारा असतो त्याला आप्त म्हणावे ।

८२. **परीक्षा**–प्रत्यक्षादि आठ प्रमाण वेद विद्या आत्मशुद्धी आणि सृष्टिक्रमाच्या अनुकूल विचार करून सत्यासत्याचा योग्य निश्चय करणे याला परीक्षा म्हणतात।

८३. **आठ प्रमाण**–प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, ऐतिह्य, अर्थापत्ती, संभव आणि अभाव हे आठ प्रमाण आहेत या आठ प्रमाणानीच मनुष्य सत्यासत्याचा यथायोग्य निश्चय करू शकतो ।

८४. **लक्षण**–ज्या मुळे लक्ष जाणले जाते जो कि त्याचा स्वाभाविक गुण आहे जसे अग्निचा गुण रूप आहे रूपानेच अग्नि जाणला जातो या मूळे त्याला लक्षण म्हणतात ।

८५. **प्रमेय**–जे प्रमाणांनी जाणले जाते जसे डोळ्याचे प्रमेय रूप आहे जे इन्द्रियानी जाणले जाते त्याला प्रमेय म्हणतात ।

८६. **प्रत्यक्ष**–जे ज्ञान शब्दादि पदार्थाबरोबर श्रोत्रादि इन्द्रिय आणि मनाच्या निकट सम्बधाने प्रसिद्ध होते

त्याला प्रत्यक्ष म्हणावे ।

८७. **अनुमान**–एखाद्या पूर्व दृष्ट पदार्थाच्या एका अंगास प्रत्यक्ष पाहिल्यानंतर त्या पदार्थाच्या अदृष्ट अंगाचेहि यथावत ज्ञान होते त्याला अनुमान म्हणतात ।

८८. **उपमान**–एखाद्या माणसाने दूसऱ्या माणसाला असे सांगितले की गायी सारखीच नीलगाय असते हे ज्ञान सादृश्य उपमा दिल्यामुळे होते त्याला उपमान म्हणतात ।

८९. **शब्द**–जो पूर्ण आप्त परमेश्वर आणि पूर्वोक्त आप्त मनुष्याचा उपदेश आहे त्यास शब्द असे म्हणतात।

९०. **ऐतिह्य**–जो शब्द प्रमाणाच्या अनुकूल असावा तसेच जो असंभव व खोटा नसावा त्याला ऐतिह्य असे म्हणतात ।

९१. **अर्थापत्ती**–एखादी गोष्ट सांगितल्यावर दूसरी गोष्ट न सांगताहि लक्षात येते त्यालां अर्थापत्ती म्हणतात।

९२. **संभव**–जी गोष्ट प्रमाण युक्ती आणि सृष्टि क्रमाने युक्त म्हणजे सृष्टीनियमानुसार असते त्याला संभव म्हणतात ।

९३. **अभाव**–एका माणसाने दूसऱ्या माणसाला पाणी आणण्यासाठी सांगितले दूसरा माणूस त्या ठीकाणी गेला पण तिथे पाणी नव्हते तर मग त्या मानसाने कुठेहि जावून पाणी आणले पाहिजे या अभावाच्या निमित्ताने जे ज्ञान होते त्याला अभाव प्रमाण म्हणतात ।

९४. **शास्त्र**–जे सत्य विद्येचे योग्य प्रकारे प्रतिपादन

करते आणि त्यामुळे मनुष्याला सत्य ज्ञानाचे शिक्षण मिळते त्याला शास्त्र म्हणतात ।

९५. **वेद**–जी ईश्वरोक्त सत्यविद्यानी युक्त ऋकसंहितादि चार पुस्तके आहेत ज्यामुळे मनुष्याला सत्याचे ज्ञान होते त्याला वेद म्हणावे ।

९६. **पुराण**–जी प्राचीन ऐतरेय, शतपथ, ब्राह्मणादि ऋषी मुनीकृत सत्याचा अर्थ सांगणारी पुस्तके आहेत त्यान्नाच पुराण, इतिहास, कल्प, गाथा, नाराशंसी म्हणतात।

९७. **उपवेद**–आयुर्वेद म्हणजे वैद्यक शास्त्र, धनुर्वेद म्हणजे शास्त्र विद्या व राजधर्म शास्त्र, गांधर्ववेद म्हणेज गान विद्याशास्त्र अर्थवेद म्हणेज शिल्प शास्त्र हे चार उपवेद आहेत ।

९८. **वेदांग**–शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त छन्द आणि ज्योतिष हे सर्व आर्ष सनातन शास्त्र आहेत याना वेदांग म्हणतात ।

९९. **उपांग**–जे ऋषि मुनिकृत मिमांसा, वैशेषिक, न्याय योग, सांख्य, आणि वेदांत हे सहा शास्त्र आहेत यांना दर्शन किंवा उपांग म्हणतात ।

१००. **नमस्ते**–मी तुमचा मान सम्मान करतो ।

**इति आर्योद्देश्यरत्नमाला ।**

लातूर ओ३म् दि. 23-7-88

श्री-श्र. नंदकिशोरजी स-नमस्ते.

आप गत मास मे औरंगाबाद आये थे वहाँ
मेरी कन्या निवेदिता से आप मिले और मेरे
संबंध मे बात-चीत भी की. आपने अपने
किसी मासिक पत्र मे मेरा कुछ वर्णन
भी किया है ऐसा मुझे मालूम हुवा तदर्थ
धन्यवाद. आपने उसको मत भी कहा है
कि अगर मै मराठी साहित्य भेजूं तो आप
प्रकाशित करेंगे. मैने आर्योद्देश्य रत्नमाला
का मराठी भाषा मे अनुवाद करके भेजा है
कृपया प्रकाशित कीजिए और मुझे दो चार
कापीया भेज दीजिए. धन्यवाद

आपका

Pin (413512) उत्तम मुनिलाल, प्रस्थ

विद्यानगर लातूर पो. जि. लातूर महाराष्ट्र